# प्रकरण तिसरे

## दौलत शेतकरी सहकारी साखर कारखान्याचे कामकाज

### विभाग पहिला

दौलत शेतकरी सहकारी साखर कारखाना
स्थापना, उद्दिष्टे, भांडवल उभारणी, कार्यक्षेत्र

**प्रस्तावना :**

भारताच्या आर्थिक नियोजनाच्या सुरुवातीपासून साखर उद्योगाचा विकास व नियंत्रण ही मध्यवर्ती अथवा राज्य सरकारची जबाबदारी मानण्यात आली. १९५१ च्या औद्योगिक विकास व नियमन कायद्यात नवीन साखर कारखान्यांना परवाना देण्यासाठीचे मार्गदर्शक धोरण ठरविण्यात आले त्यानुसार -

१) नवीन सहकारी साखर कारखान्यांसाठी सहकार क्षेत्राला प्राधान्य द्यावे.

२) ज्या ठिकाणी उसाचे भरपूर उत्पादन आहे अथवा ऊस उत्पादनाची संभाव्य क्षमता आहे अशाच ठिकाणी साखर कारखान्याला परवाना द्यावा.

३) अस्तित्वात असलेल्या साखर कारखान्याच्या ३० मैलांच्या परिसरात नवीन कारखान्याला परवानगी देऊ नये.[१]

वरील घटकांचा विचार करून राज्य सरकार नियोजित साखर कारखान्याला परवाना मिळण्यासंबंधीची शिफारस केंद्र सरकारला करते व केंद्र सरकारकडून परवाना दिला जातो. याच तत्वाला अनुसरून दौलत शेतकरी सहकारी साखर कारखान्याची स्थापना होऊ शकली.

---------

१. Manoharrao P.J. : Development of Indian Sugar Industry, Historical Bhartiya Sugar, 1983-84, Directory.

१) दौलत शेतकरी सहकारी साखर
कारखाना स्थापनेचा प्रस्ताव [१]

कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड तालुक्याच्या आर्थिक व भौगोलिक परिस्थितीचा आढावा घेऊन त्याचबरोबर शेती व्यवसायाला सहाय्यभूत ठरणाऱ्या सहकारी साखर कारखान्याची अनिवार्य निकड लक्षात घेऊन प्रवर्तक म्हणून सामाजिक कार्यात आघाडीवर असणारी मंडळी श्री. व्ही.के. चव्हाण पाटील, श्री. भरमू सुबराव पाटील, श्री. नरसिंगराव गुरूनाथ पाटील व कै. पी.एन. खांडेकर आदींनी कारखाना काढण्यासंबंधीचे १९५६ साली ठरविले. १९५७ ला या मंडळींनी चंदगड तालुक्यातील सहकारी संस्थांच्या पदाधिकाऱ्यांची एक सभा बोलावली. सभेमध्ये तालुक्यातील सहकारी संस्थांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, आणि शेतकरी यांच्या उपस्थितीत चंदगड, आजरा, गडहिंग्लज या तालुक्यांच्या विकासाचे उद्दिष्ट ठेवून कारखाना काढण्यासंबंधीचा ठराव एकमताने संमत करण्यात आला. नियोजित कारखान्याचे " दौलत शेतकरी सहकारी साखर कारखाना " असे नामकरण करण्यात आले. या ठरावाला जिल्हा कॉंग्रेसने मान्यता दिली व जिल्ह्याच्या नियोजन आराखड्यामध्ये दौलत कारखान्याचा समावेश करण्यात आला.

अ) कारखान्याला परवाना

कारखाना स्थापन करण्याच्या ठरावानंतर १२ वर्षांनी म्हणजे १९६९ ला कारखान्याला परवाना मिळाला. १९७० मध्ये कारखान्याची वार्षिक सभा घेऊन तात्पुरत्या स्वरूपाच्या संचालक मंडळाची नियुक्ती करण्यात आली. परंतु संचालक मंडळातील काही सदस्यांनी राजिनामे दिल्यामुळे प्रशासक नेमला गेला. दोन वर्षाच्या प्रशासक कारकिर्दित कारखाना उभारणीची गती मंद होती. त्यानंतर सुपरवायझिंग युनियनची बैठक होऊन कारखान्याच्या विकासाचे काम जिल्हा बँकेकडे देऊन स्थगित कामाला चालना मिळावी असा आग्रह राज्य शासनाकडे केला. या योजनेला शासनाने मान्यता

----------

१. कारखान्याबाबतची ही माहिती कारखान्यांने प्रसिध्द केलेल्या कारखान्याच्या पोट-नियम पुस्तिकेतून व स्मरणिकेतून घेतली आहे.

देऊन जिल्हा बँकेच्या चेअरमनकडेच कारखान्याची सूत्रे सोपविण्यात आली. त्यावेळी जिल्हा बँकेचे चेअरमन नरसिंगराव गुरुनाथ पाटील होते. पर्यायाने चेअरमनपदाची सूत्रे त्यांच्याकडेच सोपविण्यात आली. कारखान्याचा पहिला गळित हंगाम १९७७-७८ मध्ये सुरु झाला.

ब) कारखान्याची उद्दिष्टे

ग्रामीण भागातील साखर कारखाना त्या भागाच्या आर्थिक व सामाजिक विकासात चांगली कामगिरी बजावू शकतो असे अनुभवास आले आहे.* दौलत शेतकरी सहकारी साखर कारखाना * स्थापन असताना हाच हेतू डोळ्यासमोर ठेवून कारखान्याच्या स्थापनेची काही उद्दिष्टे पुढीलप्रमाणे नमूद करण्यात आली आहेत.

१) ऊस उत्पादकाला स्थिर बाजारपेठ व किमान भाव मिळवून देणे.
२) शेतीविषयक सुधारलेल्या पध्दतींचा अवलंब करणे व ऊस उत्पादनाच्या आधुनिक पध्दतींचा अवलंब करण्यासाठी कारखान्याकडून शेतीपूरक साधनांचा पुरवठा करणे.
३) कार्यक्षेत्रामध्ये पाणी पुरवठा योजना व शेती विकास योजनांची अंमलबजावणी करणे.
४) सभासद शेतकरी, कर्मचारी आणि कारखाना कार्यक्षेत्रातील लोकांच्या शैक्षणिक व सांस्कृतिक विकासाच्यादृष्टीने निरनिराळ्या योजनांची अंमलबजावणी करणे.
५) कारखान्याकडून आलेल्या ऊसापासून पूरक उत्पादने तयार करणे.
६) कारखान्यावर शेतावरुन ऊस आणण्यासाठी वाहतूक खर्च कमी व्हावा, वेळेची बचत व्हावी, याकरिता नवीन रस्ते बांधणी करणे व अस्तित्वात असलेल्या रस्त्यांची निगा राखणे.
७) सभासदांमध्ये स्वावलंबन, काटकसर व सहकार्य वाढीस उत्तेजन देणे.
८) शेती व शेतमालाच्या विकासासाठी सभासदांच्या ऊसाच्या तारणावर आगाऊ कर्जपुरवठा करणे.

९) जेथे ऊसाचे पिक येणे अशक्य आहे तेथे अन्नधान्य पिके व रोखीची पिके घेण्यास उत्तेजन देणे.

ही उद्दिष्टे असे दर्शवितात की, कारखान्याच्या स्थापनेमागे कारखान्याच्या भोवतालच्या ग्रामीण भागाचा आर्थिक व सामाजिक विकास साधणे हाच प्रमुख हेतू आहे. कारखाना वरील उद्दिष्टांची पूर्तता जितक्या प्रमाणात करेल त्यावर हा कारखाना आर्थिक व सामाजिक विकासाचे केंद्र बनणार आहे की नाही हे अवलंबून राहील.

क) कारखान्याची वित्त उभारणी

१२५० मे. टन दैनंदिन गाळपक्षमता असणाऱ्या या कारखान्यांसाठी पुढीलप्रमाणे वित्त उभारणी करण्याचे ठरविण्यात आले. वित्त उभारणीचा तपशील पुढीलप्रमाणे :

कोष्टक १

दौलत शेतकरी सहकारी कारखान्याची वित्त उभारणी

(रुपये लाख)

| | |
|---|---|
| १) अधिकृत भाग भांडवल | २०५.०० |
| पैकी | |
| अ) उत्पादक सभासद | १००.०० |
| ब) सहकारी संस्था व बिगर उत्पादक सभासद | ५.०० |
| क) महाराष्ट्र सरकार | १००.०० |
| २) कर्ज उभारणी | २९४.३८ |
| पैकी | |
| अ) महाराष्ट्र राज्य सह. बँक | ५०.६४ |
| ब) शेती व ग्रामीण विकास बँक | १४२.६६ |
| क) कोल्हापूर जिल्हा सह. बँक | २९.३१ |
| ड) भारताचे औ. वित्त पुरवठा महामंडळ | ७१.७७ |
| एकूण वित्त उभारणी | ४९९.३८ |

अधिकृत भाग भांडवल

दौलत सहकारी साखर कारखान्याचे अधिकृत भाग भांडवल २०५ लाख रुपये असून ते खालील प्रमाणे विभागले आहे :


१) १०,००० भाग १,००० दर्शनी किंमतीचे प्रथम अग्रहक्काचे उत्पादक सभासदांना देण्यासाठी.
२) ५०० भाग १,००० दर्शनी किंमतीचे द्वितीय अग्रहक्काचे सहकारी संस्थांना देण्यासाठी.
३) १०,००० भाग १,००० दर्शनी किंमतीचे महाराष्ट्र सरकारला देण्यासाठी.

ड) कार्यक्षेत्र :

दौलत सहकारी साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रात सुरुवातीला एकंदर २३१ गावे समाविष्ट होती. त्याची तालुका निहाय विभागणी अशी -

| तालुका | गावांची संख्या |
|---|---|
| १. चंदगड तालुका | १३१ |
| २. आजरा तालुका | ८३ |
| ३. गडहिंग्लज तालुका | १५ |
| ४. सावंतवाडी तालुका | २ |
| एकूण | २३१ |

गडहिंग्लज सहकारी साखर कारखान्याच्या उभारणीमुळे वरील कार्यक्षेत्रात राज्य सरकारने बदल केलेला आहे. हा बदल खालीलप्रमाणे :


दौलत सहकारी साखर कारखान्याचे कार्यक्षेत्र
बांधकाम विभाग
जि. प. कोल्हापूर.
गडहिंग्लज
आजरा
चंदगड
० २ ४ ६ ८ १० १२ मैल.
तालुक्याचे ठिकाण
कार्यक्षेत्रातील गावे.
तालुका सीमारेषा (अंतर्गत)
कार्यक्षेत्राबाहेरील तालुका सीमारेषा
कारखान्याचे ठिकाण.

| तालुका | गावांची संख्या |
|---|---|
| १. चंदगड तालुका | १४५ |
| २. आजरा तालुका | ६३ |
| ३. गडहिंग्लज तालुका | १४ |
| एकूण : | २२२ |

ही विभागणी लक्षात घेतल्यास कारखान्याच्या कार्यक्षेत्रात चंदगड तालुक्यातील सर्वात जास्त गांवे समाविष्ट आहेत. कारखान्याची उद्दिष्टे खरोखरच साध्य झाल्यास त्यामुळे चंदगड तालुक्याच्या एकंदर विकासाला सर्वात जास्त मदत होणार आहे. हे स्पष्ट आहे. त्यामुळे कारखान्याचे मूल्यमापन करत असताना चंदगड तालुक्याच्या विकासाचा प्रामुख्याने विचार केला आहे.

## विभाग दुसरा

## दौलत शेतकरी सहकारी साखर कारखान्याचे मूल्यमापन

१) सभासदत्व :

भारतासारख्या लोकशाही समाजवादी राष्ट्रांत साखर कारखान्याचे संघटन व व्यवस्थापन सहकारी तत्वावर करणे याला विशेष महत्व असते. या कारखान्याची भांडवल उभारणी करत असताना लहान व सीमांत भूधारकांमध्ये प्रामुख्याने भाग भांडवल विभागून दिल्यास कारखान्यामुळे मिळणाऱ्या आर्थिक व सामाजिक लाभाचे ते वाटेकरी बनतात. समाजातील दुर्बल घटकांची आर्थिक उन्नती सहकारी संघटनेने अशी साधली जाते. दौलत शेतकरी साखर कारखान्याच्या अभ्यास या हेतूने करणे महत्वाचे आहे. हा अभ्यास करीत असताना सुरुवातीला सहकारी साखर कारखान्यातील भाग धारकांच्या वर्गीकरणाचा सर्वसाधारण विचार केला आहे.

अ) भागधारक

कोणत्याही सहकार तत्वप्रणीत उद्योगाच्या वित्तीय उभारणीत भागधारकांकडून होणारी भांडवल उभारणी हा एक महत्वाचा मार्ग असतो. सहकारी साखर कारखान्याला येणारा खर्च प्रथम राज्य सरकारकडून निश्चित केला जातो. एकूण प्रकल्प निश्चितीतील अधिकृत भाग भांडवल किती असावे हे राज्य शासनाकडून ठरविले जाते. मात्र अधिकृत भांडवलाची विभागणी किती भागात करावी, प्रत्येक भागाची दर्शनी किंमत किती असावी व एकूण भागांपैकी किती भाग विक्रीला काढावेत या संबंधीचे सर्व अधिकार संबंधित संचालक मंडळाला राज्य शासनाने ठरवून दिलेले असतात.

ब) भागधारकांचे वर्गीकरण

सहकारी साखर कारखान्याच्या सभासदत्वामध्ये चार भाग पाडण्यात आले आहेत.

१. उत्पादक सभासदत्व

जे भागधारक संबंधित संस्थेचे भाग धारण करतात त्यांना भागधारक म्हणतात. असे भागधारक कच्चा माल उत्पादित करून उत्पादन प्रक्रियेसाठी उद्योग प्रकल्पाला पाठवित असतील तर त्याला उत्पादक सभासद असे म्हणतात. उत्पादक सभासदत्व पूर्ततेसाठी ती व्यक्ती व जमीन त्या कार्यक्षेत्रातील असली पाहिजे तसेच भागधारण केल्यानंतर तीन वर्षांपर्यन्त जर त्या व्यक्तीने ऊस करार करून ऊस पुरविला नसेल तर त्याचे सभासदत्व रद्द करण्याचा अधिकार संचालक मंडळाला आहे.

२. अनुत्पादक सभासदत्व

अनुत्पादक सभासदांचे वर्गीकरण दोन गटात करण्यात आले आहे :

अ) व्यक्ती

कारखाना कार्यक्षेत्रातील अशा व्यक्ती की ज्यांनी कारखान्याचे भाग धारण केलेले आहेत पण कच्चा मालाचा पुरवठा करू शकत नाहीत, त्यांना अनुत्पादक सभासद म्हणतात.

5668
B.

ब) संस्था

कारखाना कार्यक्षेत्रातील सहकारी संस्थांना कारखान्याचे सभासदत्व स्वीकारता येते. सहकारी संस्थांना भागधारक करण्याचा हेतू हा की, ग्रामीण भागातील सहकारी संस्थांची वित्तिय उभारणी भक्कम व्हावी त्यायोगे सहकारी क्षेत्राचे विस्तारीकरण जलद गतीने व्हावे व सहकाराचे फायदे सर्वसामान्यांना मिळावेत.

३. नाममात्र सभासदत्व :

कार्यक्षेत्रातील व्यापारी पेढया,कंपन्या, खाजगी सोसायटया व संस्थांना नाममात्र सभासदत्व दिले जाते.

४. बेनिफिशरी सभासदत्व

संबंधित कारखान्यांमार्फत कार्यक्षेत्रात विकास कार्यक्रम राबविल्याने ज्या व्यक्तींना विकास कार्यक्रमांचा लाभ मिळेल अशा व्यक्तींची गणना बेनिफिशरी सभासदांत केली जाते.

वरील प्रकारच्या वर्गीकरणामधील सभासदत्वाबाबतच्या अटी व नियम राज्य सरकारने संस्थेला ठरवून दिलेले असतात त्यानुसार व्यक्तींना भागधारक करण्याचे बंधन संबंधीत संस्थेला असते.

कोणत्याही व्यक्तीला एकपेक्षा अधिक भाग धारण करता येत नाहीत, जर विक्रीला काढण्यात आलेल्या भागांची विक्री होत नसेल तर इच्छुकांना एकपेक्षा अधिक भाग देण्याचे धोरण संचालक मंडळ अवलंबू शकते.

साखर कारखान्यांचा विकास झालेल्या महाराष्ट्रात अनुत्पादक सभासदांचे प्रमाण अत्यंत अल्प आहे. महाराष्ट्रात साखर कारखान्यांच्या एकंदर भागधारकांपैकी ४८ टक्के भागधारक सीमांत भूधारक आहेत. तर २६ टक्के १ एकरापेक्षा जास्त व दोन एकरापेक्षा कमी जमिनीचे धारक आहेत. एकूण संचालक वर्गापैकी ४० टक्के दोन एकरापेक्षा कमी जमिनीचे धारक आहेत.[३]

----------

३. लोकराज्य, रौप्यमहोत्सवी विशेषांक, १ मे १९८५, पृ.१३५.

वरील माहितीच्या आधारे असे म्हणता येईल की, महाराष्ट्रातील कारखान्यात समाजातील दुर्बल घटकांचा महत्वाचा सहभाग आहे.

दौलत शेतकरी सहकारी साखर कारखान्याच्या सभासदत्वाचा अभ्या कोष्टक २, ३ व ४ च्या आधारे करता येईल.

कोणत्याही सहकारी साखर कारखान्याच्या संदर्भात जमीन धारण क्षेत्रानुसार उत्पादक सभासदांचे वर्गीकरण विशेष महत्वाचे असते. कारण वर्गीकरणामुळेच कोणताही सहकारी साखर कारखाना मोठया संख्येने लहान उ उत्पादकांना सभासद करुन घेतो की नाही हे समजते. कोष्टक २ च्या आधारे शेतकरी सहकारी साखर कारखान्याच्या सभासदांचे वर्गीकरण अभ्यासल्यास या बाबतची कारखान्याची कामगिरी खरोखरच उल्लेखनीय आहे.

१९७७-७८ या वर्षी म्हणजे कारखान्याच्या पहिल्या गळित हंगामात उत्पादक सभासदांपैकी (५६४१) ९४.०८ टक्के सभासद ½ ते ५ एकर जमीन धा असणारे होते. या सर्वांचा समावेश सीमांत व लहान शेतक-यात करता येईल.

१९८४-८५ मध्ये कारखान्याच्या एकूण उत्पादक सभासदांची संख्या ९ झाली या वाढीप्रमाणेच कारखान्याच्या उत्पादक सभासदांत सीमांत व लहा शेतक-यांचे प्रमाण ही वाढले हे प्रमाण ९६.०७ टक्के झाले. हे वर्गीकरण या कारखान्यात दुर्बल घटकांचा महत्वाचा सहभाग आहे हे दर्शविते. सहाजिकच या कारखान्यापासून मिळणारे आर्थिक व सामाजिक लाभही या वर्गाला जास्त मि शकतील.

| तपशील | वर्ष १९७७-७८ | एकूण सभासदांशी शेकडा प्रमाण | प्रत्येक गटातील ऊस पुरविलेले उत्पादक सभासद | प्रत्येक गटातील सभासद ऊस पुरविणा-याशी शेकडा प्रमाण | वर्ष १९८४-८५ | एकूण सभासदांशी शेकडा प्रमाण | प्रत्येक गटातील ऊस पुरविलेले उत्पादक सभासद | प्रत्येक गटातील सभासदांचे ऊस पुरविणा-यांशी शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ½ ते १ एकर | २०८८ | ३७.०३ | १८०८ | ८६.५९ | ३४३५ | ३७.४७ | ३४३० | ९९.७६ |
| १ ते २ एकर | १६९३ | ३०.०२ | १६३० | ९६.२२ | २६४५ | २८.८३ | २५३२ | ९५.७२ |
| २ ते ३ एकर | ८४८ | १५.०४ | ७७८ | ९१.७४ | १५८५ | १७.३० | १४१८ | ८९.३५ |
| ३ ते ४ एकर | ४५२ | ८.०१ | ४३२ | ९५.५७ | ७०५ | ७.६८ | ७०० | ९९.२९ |
| ४ ते ५ एकर | २२५ | ३.९८ | १८१ | ८०.४४ | ४४० | ४.७९ | ३९१ | ८८.८६ |
| ५ ते १० एकर | १५२ | २.६९ | १४१ | ९७.७६ | २१३ | २.३२ | २०८ | ९७.६५ |
| १० ते १५ एकर | ११३ | २.०० | १०८ | ९५.५७ | ७६ | ०.८३ | ६१ | ८०.२६ |
| १५ ते २० एकर | ५२ | ०.९२ | .५२ | १०० | ६२ | ०.६७ | ५४ | ८७.०९ |
| २० ते ३० एकर | १४ | ०.२४ | १४ | १०० | १० | ०.१० | १० | १०० |
| ३० ते ५० एकर | ४ | ०.०७ | ४ | १०० | २ | ०.०२ | २ | १०० |
| एकूण उत्पादक सभासद | ५६४१ | १०० | ५१४८ | ९१.२६ | ९१७३ | १०० | ८८०६ | ९५.९९ |

संदर्भ : शेती विभागाकडून प्रत्यक्ष मिळविलेली माहिती.

कोष्टक २

जमीन धारण क्षेत्रानुसार उत्पादक सभासदांचे वर्गीकरण

## कोष्टक ३

### उत्पादक व अनुत्पादक सभासदांचे वर्गीकरण

| वर्ष | उत्पादक सभासद | अनुत्पादक सभासद | एकूण सभासद | शेकडा वाढ |
|---|---|---|---|---|
| १९७६-७७ | ५१८२ (९७.२२) | १४८ (२.७८) | ५३३० | |
| १९७७-७८ | ५६४१ (९७.७९) | १२७ (२.२१) | ५७६८ | ८.२१ |
| १९७८-७९ | ५६९२ (९९.०४) | ५५ (०.९६) | ५७४७ | ७.८२ |
| १९७९-८० | ५६९२ (९९.०४) | ५५ (०.९६) | ५७४७ | ७.८२ |
| १९८०-८१ | ५६९८ (९९.०५) | ५५ (०.९६) | ५७५३ | ७.९३ |
| १९८१-८२ | ९१७२ (९९.१६) | ७७ (०.८४) | ५७६८ | ८.२१ |
| १९८२-८३ | ९१७२ (९९.१६) | ७७ (०.८४) | ९२४९ | ७३.५२ |
| १९८३-८४ | ९१७३ (९९.१६) | ७७ (०.८४) | ९२५० | ७३.५२ |
| १९८४-८५ | ९१७३ (९९.१६) | ७७ (०.८४) | ९२५० | ७३.५२ |

टीप : स्तंभातील कंसातील आकडे शेकडा प्रमाण दाखवितात.

संदर्भ : कारखान्याचे वार्षिक अहवाल १९७६-७७ ते १९८४-८५.

कोष्टक ३ वरून असे दिसून येते की, १९७६-७७ साली एकूण सभासद ५३३० होते. त्यापैकी उत्पादक सभासद ९७.२२ टक्के व अनुत्पादक सभासद २.८८ टक्के होते.

१९८२-८३ या वर्षी एकूण सभासदांशी तुलना करता उत्पादक सभासदांचे शेकडा प्रमाण ९७.२२ टक्क्यावरून ९९.१६ टक्क्यापर्यन्त वाढलेले आहे. या उलट अनुत्पादक सभासदांचे प्रमाण २.७७ टक्के वरून ०.८४ टक्के घटलेले आहे. सहकारी साखर कारखाने या उत्पादकांच्या सहकारी संघटना असल्याने या संघटनात ऊस उत्पादक सभासदांचे प्रमाण जास्त असणे केंव्हाही चांगले मानावे लागेल. दौलत सहकारी साखर कारखान्याने याकडे योग्य लक्ष दिले आहे असे म्हणता येईल.

दौलत शेतकरी साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रात समाविष्ट असणा-या सभासदांचा तालुका निहाय तपशील कोष्टक ४ मध्ये दिलेला आहे.

## कोष्टक ४

### उत्पादक सभासदांची तालुका निहाय विभागणी

| | ७६-७७ | ७७-७८ | ७८-७९ | ७९-८० | ८०-८१ | ८१-८२ | ८२-८३ | ८३-८४ | ८४-८५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कार्यक्षेत्रातील गावे | १३१ | १३१ | १३१ | १३१ | १४५ | १४५ | १४५ | १४५ | १४५ |
| सभासद गांवे | ११८ | ११८ | ११८ | ११८ | १३० | १३० | १३० | १३० | १३० |
| चंदगड एकूण सभासद | ४२३५ | ४५७४ | ४६०६ | ४६०६ | ४६०६ | ४६०८ | ७६४२ | ७६४२ | ७६४२ |
| कार्यक्षेत्रातील गावे | ८३ | ८३ | ८३ | ८३ | ६३ | ६३ | ६३ | ६३ | ६३ |
| सभासद गांवे | ८३ | ८३ | ८३ | ८३ | ६३ | ६३ | ६३ | ६३ | ६३ |
| आजरा एकूण सभासद | ३६१ | ४७९ | ४८६ | ४८६ | ४८६ | ४८६ | ८५२ | ८५२ | ८५२ |
| कार्यक्षेत्रातील गावे | १५ | १५ | १५ | १५ | १४ | १४ | १४ | १४ | १४ |
| सभासद गांवे | १५ | १५ | १५ | १५ | १४ | १४ | १४ | १४ | १४ |
| गडहिंग्लज एकूण सभासद | ५८६ | ५८८ | ६०० | ६०० | ६०२ | ६०२ | ६७५ | ६७९ | ६७९ |

संदर्भ : सभासद मतदार यादी १९८२-८३,
दौलत शेतकरी सहकारी साखर कारखाना.

भागभांडवलाची वसूली :

कोणत्याही औद्योगिक संघटनेत त्या संघटनेने भाग भांडवलामार्फत उभारलेला पैसा हा संघटनेचा स्वत:चा भांडवली पैसा मानता येईल हा पैसा लौकर उभारला न गेल्यास संबंधित संघटनेला वित्त उभारणीच्या अन्य मार्गांवर जास्त अवलंबून राहावे लागेल. दौलत शेतकरी सहकारी साखर कारखान्यांचे आपल्या अधिकृत भाग भांडवलातून विक्रीला काढलेल्या व वसूल झालेल्या भांडवल उभारणीचा तपशील कोष्टक ५ मध्ये दिलेला आहे.

कोष्टक – ५

## कारखान्याने विक्रीला काढलेले व वसूल झालेले भांडवल

| | १९७६-७७ | | | १९७७-७८ | | | १९७८-७९ | | | १९७९-८० | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | सभासद संख्या | धारण भाग | प्रत्यक्षात जमा रक्कम | सभासद संख्या | धारण भाग | प्रत्यक्षात जमा रक्कम | सभासद संख्या | धारण भाग | प्रत्यक्षात जमा रक्कम | सभासद संख्या | धारण भाग | प्रत्यक्षात जमा रक्कम |
| उत्पादक सभासद | ५१८२ | ५४८३ | ४०१८६०० | ५६४१ | ५९४९ | ४५४१७५३ | ५६९२ | ६००० | ४९२६६२३ | ५६९२ | ६००० | ५१४१५६६ |
| बिगर उत्पादक सभासद : | | | | | | | | | | | | |
| व्यक्ती | ९३ | ९८ | ४९८८५ | ७१ | ७४ | ३९५०३ | - | - | - | - | - | - |
| संस्था | ५२ | ७७ | ७०२५० | ५४ | ८८ | ८१२५० | ५४ | ८८ | ८१२५० | ५४ | ८८ | ८१२५० |
| संस्था अमानत | २ | ११ | ११००० | १ | १ | १००५ | - | - | - | - | - | - |
| महाराष्ट्र सरकार | १ | ९५५० | ९५५०००० | १ | १०००० | १००००००० | १ | १०००० | १००००००० | १ | १०००० | १००००००० |
| एकूण : | ५३३० | १५२१९ | १३६९९७३५ | ५७६८ | १६११२ | १४६६३५५११ | ५७४७ | १६०८८ | १५००७८७३ | ५७४७ | १६०८८ | १५२२२८१६ |

संदर्भ : दौलत शेतकरी सहकारी साखर कारखान्याचे वार्षिक अहवाल १९७६-७७ ते १९८४-८५.

कोष्टक - ५ (पुढे चालू....)

कारखान्याने विक्रीला काढलेले व वसूल झालेले भांडवल

| | १९८०-८१ | | | १९८१-८२ | | | १९८२-८३ | | | १९८३-८४ | | | १९८४-८५ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | सभासद संख्या | धारण भाग | प्रत्यक्षात जमा रक्कम | सभासद संख्या | धारण भाग | प्रत्यक्षात जमा रक्कम | सभासद संख्या | धारण भाग | प्रत्यक्षात जमा रक्कम | सभासद संख्या | धारण भाग | प्रत्यक्षात जमा रक्कम | सभासद संख्या | धारण भाग | प्रत्यक्षात जमा रक्कम |
| उत्पादक सभासद | ५६९८ | ६००० | ५३०६६६३ | ५७१३ | ६००० | ५४७५५८२ | ९१७२ | ९८१३ | ७११६९२७ | ९१७३ | ९८१३ | १५१४९६९६ | ९१७८ | ९८१३ | १३४४३५६४ |
| बिगर उत्पादक सभासद : | | | | | | | | | | | | | | | |
| व्यक्ती | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| संस्था | ५४ | ८८ | ८१२५० | ५४ | ८८ | ८२७५० | ७६ | ११० | ९३५०० | ७६ | ११० | ९४२५० | ७६ | ११० | ९८९१० |
| संस्था अनामत | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| महाराष्ट्र सरकार | १ | १००० | १०००००० | १ | १०००० | १०००००० | १ | १००० | १०००००० | १ | ९५०० | ९५००००० | १ | ९००० | ९०००००० |
| एकूण : | ५७५३ | १६०८८ | १५३७७९१३ | ५७६८ | १६०८८ | १५५५८३३२ | ९२४९ | १९९२३ | १७२१०४२७ | ९२५० | १९४२३ | १७२५९४४१ | ९२५५ | १९९२३ | २२५४२४७४ |

संदर्भ : दौलत शेतकरी सहकारी साखर कारखान्याचे
वार्षिक अहवाल - १९७६-७७ ते १९८४-८५.

कारखान्याच्या भागभांडवल उभारणीत महाराष्ट्र सरकारला देण्यात येणा-या १०,००० भागांची विक्री होऊन १,००,००,००० रूपये वाटा महाराष्ट्र सरकारने उचललेला होता.

कारखान्याचा प्रत्यक्ष गळित हंगाम सुरू होण्यापूर्वी कारखान्याने उत्पादक सभासदांच्यासाठी ६,००० भाग विक्रीला काढलेले होते या भागांची १९७८-७९ मध्ये संपूर्ण विक्री होऊनसुद्धा १९८२-८३ पर्यन्त कारखान्यांने नवीन भाग विक्रीला काढले नाहीत. नवीन भाग विक्रीला काढल्याने कारखान्या जवळच्या भागभांडवलाच्या रूपात उभारला जाणारा पैसा वाढण्याला मदत झाली असती परंतु कारखान्यांने या दृष्टिकोनातून भाग भांडवल्याची विक्री केल्याचे आढळत नाही.

१९८२-८३ मध्ये कारखान्यांने उत्पादक सभासदांसाठी आणखीन ४,००० भाग विक्रीला काढले १९८३-८४ मध्ये एकूण १०,००० भागांपैकी ९८१३ भागांची विक्री झालेली होती. तर एकूण भाग भांडवलाच्या ८४.१९ टक्के भागभांडवल जमा झालेले होते.

१९८४-८५ मध्ये कारखान्यांने वाढीव गाळप क्षमता व मद्यार्क शाळेच्या उभारणीसाठी भागांची किंमत १,००० रूपयांवरून २,००० रूपये इतकी वाढविली यामुळे कारखान्याच्या भाग भांडवलात एकदम बदल झाले. या बदलामुळे १९८५ अखेर रू. २,४५,४२,४७४ कारखान्याचे वसूल झालेले भाग भांडवल होते.

उत्पादन :

कारखान्याच्या कामकाजाकडे नजर टाकल्यास काही घटना ठळकपणे लक्षात येतात. त्या संबंधीचा तपशील कोष्टक ६ मध्ये दिलेला आहे.

कार्यक्षेत्रातील ऊसाचे एकूण उत्पादन पहिल्या गळित हंगामकाळात १,८९,५४० मे. टन होते. त्यानंतरच्या सलग तीन वर्षात उत्पादन घटलेले आहे. १९८१-८२ व १९८२-८३ या गळित हंगाम काळात ऊस उत्पादन वाढलेले आहे. मात्र १९८३-८४ मध्ये ऊस उत्पादनात लक्षणीय घट झाली आहे. तर १९८४-८५ मध्ये पुन्हा वाढ झालेली आहे. कच्च्या मालाचा सातत्याने पुरवठा या दृष्टीने ही परिस्थिती फारशी समाधानकारक म्हणता येणार नाही. ऊसाच्या उत्पादनावर हंगामाचे दिवस अवलंबून असतात व साखरेचे एकंदर उत्पादनही अवलंबून असते याचा विचार करता कच्च्या मालाचा पुरवठा या घटकांकडे कारखान्याने विशेष लक्ष देणे जरुरीचे आहे.

साखर कारखान्याने केलेले साखर उत्पादन विचारात घेतल्यास आठ गळित हंगामात साखरेच्या उत्पादनात निव्वळ ४५ टक्के वाढ झाली. १९८२-८३ च्या गळित हंगाम काळात साखरेच्या उत्पादनाचा उच्चांक प्रस्थापित झाला परंतु साखर उत्पादनातील वाढ हा कोणत्याही साखर कारखान्याच्या प्रगतीचा एकमेव निकष मानणे योग्य होणार नाही. कारखान्याने कार्यक्षेत्रातील ऊसाचा केलेला वापर, हंगाम दिवस व गाळपशक्तीचा वापर याचाही विचार करावा लागेल.


कारखान्याच्या आठही गळित हंगामात कार्यक्षेत्रातील ऊसाचा पूर्णपणे वापर झालेला नाही. प्रत्येक गळित हंगामासाठी कार्यक्षेत्राबाहेरून ऊस आणलेला आहे. कार्यक्षेत्रा बाहेरुन ऊस आणल्याने वाहतूक खर्च वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच कार्यक्षेत्रा बाहेरुन ऊस आणल्यास दुसऱ्या कारखान्याच्या कार्यक्षेत्रात अतिक्रमण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. प्रत्येक गळित हंगाम काळात कार्यक्षेत्रातील साधारणपणे ८० टक्के ऊस कारखान्याला उपलब्ध होतो म्हणजे २० टक्के

## कोष्टक - ६


### कारखान्याच्या कामकाजाचा आढावा

| तपशील | १९७७-७८ | १९७८-७९ | १९७९-८० | १९८०-८१ | १९८१-८२ | १९८२-८३ | १९८३-८४ | १९८४-८५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कार्यक्षेत्रातील एकूण ऊस क्षेत्र (हेक्टर) | २६६७.५६ | ३३३८.१४ | २७९८.८० | २८५६.४४ | ३४६४.९५ | ४९८५.६४ | ४५५५.६९ | ४२१४.०६ |
| कार्यक्षेत्रातील एकूण गाळप केलेले ऊस क्षेत्र (हेक्टर) | २२९४.७८ | २९७१.२८ | २३५०.४२ | २२६४.८४ | ३४००.९५ | ३९३०.६५ | ३५९४.८३ | ३७८४.०९ |
| कार्यक्षेत्रातील ऊसाचे एकूण उत्पादन (मे.टन) | २८९९४० | २८६४८४ | १७१९१९ | १७६००८ | ३२१६०० | ३३६००० | १९९३२५ | २७३८४० |
| एकूण ऊस गळित (मे.टन) | १६२८८१ | १९४७८२ | १३७७६७ | १५१४०८ | २७२४२४ | २७८४२४ | १५६९३४ | २२६८८१ |
| कार्यक्षेत्राबाहेरील ऊस गळित (मे.टन) | ५६९३ | ५४९४ | ६६१५ | ६३१९ | ४२१४९ | ७९८८ | २४९५ | ३९१२ |
| साखर उत्पादन (क्विंटल) | १८८४९५ | २६७३९६ | १६४६०६ | १८१७४९ | ३२७७५८ | ३३३६२५ | २१०७०९ | २७४८१५ |
| साखर उतारा | ११.६४ | ११.८४ | ११.३५ | ११.७१ | १२.०७ | ११.७१ | ११.४३ | ११.६५ |
| हंगाम दिवस | १७१ | १७८ | १२३ | १२७ | १९८ | १८४ | ११८ | १५६ |
| गाळप क्षमतेचा वापर (मे.टन) (दैनंदिन) | ९५०.६६४ | ११०१.०२४ | ११३०.०१६ | ११९१.००० | १२००.००० | १२०६.००० | १२५०.००० | १२५०.००० |
| साखरेचा उत्पादन खर्च ऊस किंमत धरून (रुपये) | २००.९७ | ३३८.८६ | ३२५.७६ | ४४७.९९ | ४०४.३० | ३१८.३८ | ३७१.५४ | ४०८.८१ |
| वहातूक खर्च रुपये दर टनाला (रुपये) | २६.२९ | २६.३१ | २९.७० | ३६.११ | ३८.१८ | ३४.९२ | ३७.५४ | ३६.०७ |
| ऊसाला दिलेला दर टनाला (रुपये) | ११० | १२६ | १९९ | २५२ | २२३.५० | २१२ | २१४ | २००.५५ |

संदर्भ : दौलत शेतकरी सहकारी साखर कारखाना
वार्षिक अहवाल १९७७-७८ ते १९८४-८५.


दौलत शेतकरी सहकारी साखर कारखान्याचे, एकूण लागवडी खालील क्षेत्र व
प्रत्यक्षात कारखान्याने केलेले गाळित क्षेत्र [ हेक्टर मध्ये ]
अ,क्ष - वर्ष
अय - एकूण ऊस लागवडी खालील क्षेत्र व,
गाळित क्षेत्र [ हेक्टर मध्ये ]
एकूण ऊस लागवडी खालील क्षेत्र
एकूण गाळित क्षेत्र.
य
६,०००
५,६००
५,२००
४८००
४,४००
४,०००
३६००
३,२००
२,८००
२,४००
२,०००
१,६००
१२००
८००
४००
0
अ १९७७-७८
७८-७९
७९-८०
८०-८१
८१-८२
८२-८३
८३-८४
८४-८५
क्ष
वर्ष
एकूण ऊस लागवडी खालील क्षेत्र व ऊस गाळित क्षेत्र [ हेक्टर मध्ये ]

## दौलत शेतकरी सहकारी साखर कारखान्याचे साखर उत्पादन. [क्विंटलमध्ये]



ऊस गु-हाळ व खाण्यासाठी वापरला जातो. ही परिस्थिती उद्भवण्याची संभाव्य कारणे पुढील असू शकतात.

१) उत्पादक सभासद शेतकरी कारखान्याच्या नियमांचे पालन करत नाहीत.
२) गूळ धंद्याच्या स्पर्धेमुळे पुरेसा ऊस उपलब्ध होत नाही.
३) कारखान्याच्या कार्यक्षेत्रात बिगर ऊस उत्पादक सभासदांचे कार्यक्षेत्रही ऊसाच्या पुरवठ्यावर परिणाम करते.

ही कारणे कारखान्याच्या संदर्भात तपासण्याचा प्रयत्न केला असता असे आढळून आले की, एकूण उत्पादक सभासदांपैकी ९५ टक्के सभासद कारखान्याला ऊस पुरवितात. (कोष्टक २) याचा परिणाम निश्चितपणे ऊसाच्या पुरवठ्यावर होतो. कारखान्याच्या कार्यक्षेत्रात बिगर सभासदांचे ऊस क्षेत्र एकूण ऊसक्षेत्राच्या जवळजवळ २५ टक्के आहे. या संबंधीची माहिती कोष्टक ७ मध्ये दिली आहे.

<u>कोष्टक ७</u>

बिगर सभासदांचे ऊस क्षेत्र

(एकरमध्ये)

| तपशील | १९७७-७८ | १९८४-८५ |
|---|---|---|
| बिगर सभासदांचे एकूण ऊस क्षेत्र | १९५७.४१ | २१४१.४९ |
| एकूण ऊस क्षेत्र | ६७१८.९० | १०५३४.५६ |
| एकूण ऊस क्षेत्राशी बिगर सभासद क्षेत्राचे प्रमाण | २९.१३ | २०.३२ |

संदर्भ : दौलत शेतकरी सहकारी साखर कारखाना शेती विभाग, प्रत्यक्ष मिळविलेली माहिती.

हे प्रमाण लक्षात घेतल्यास परिसरातील जास्तीत जास्त ऊस कारखान्याला का उपलब्ध होत नाही हे समजू शकेल. कारण बिगर सभासदांवर कारखान्यालाच ऊस पुरविण्याचे बंधन नसते. दुसरी गोष्ट कारखान्याच्या कार्यक्षेत्रात उत्पादित होणाऱ्या गुळाला नजीकची बेळगावची बाजारपेठ उपलब्ध आहे. त्यामुळे गूळ धंदा कारखान्याशी स्पर्धा करू शकतो. कारखान्याने ऊसाला दिलेला दर आणि गूळाला मिळणाऱ्या दराची तुलना करता ऊस गुळाला वापरणे शेतकऱ्याला परवडू शकते.

कोष्टक ८

बेळगांव बाजारपेठेतील गूळाचा दर

| तपशिल | ७६-७७ | ७७-७८ | ७८-७९ | ७९-८० | ८०-८१ | ८१-८२ | ८२-८३ | ८३-८४ | ८४-८५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| गूळ | १८५ ते २०२ | १२८ ते १४२ | १२० ते १३० | २०० ते २२५ | २९० ते २१६ | १८५ ते २५० | २३२ ते ३५० | २३० ते ३५० | ३१८ ते ४०८ |

संदर्भ : कृषी उत्पन्न बाजार समिती, बेळगांव १९७७ ते ८५.

साधारणत: १ टन ऊस, गूळासाठी वापरल्यास त्यापासून १½ क्विंटल गूळाचे उत्पादन होते. गूळ उत्पादन खर्च (तोडणी, वाहतूक, गुऱ्हाळ मालकाचा मोबदला) साधारणपणे १९८२ पर्यन्त एक टनाला ६० रुपये होता व त्यानंतर १०० ते ११० रुपये येत होता. १ टन ऊस गूळासाठी वापरल्यास ऊस उत्पादकाला १९७७ मध्ये साधारणपणे २०० रुपये उत्पन्न मिळत होते. तर १९८५ मध्ये गूळ उत्पादकाला साधारणपणे ३६० रुपये उत्पन्न मिळाले. कोष्टक ६ मध्ये साखर कारखान्याने पहिल्या गळित हंगामापासून ऊसाला दिलेला दर दर्शविलेला आहे. गूळापासून मिळणारे उत्पन्न व ऊसाच्या दराची तुलना केल्यास कारखान्याच्या परिसरातील ऊस गूळाच्या उत्पादनासाठी का वापरला जातो हे लक्षात येऊ शकेल. तसेच गूळापासून होणारी स्पर्धा ही भारतातील साखर कारखान्यांची समस्या का बनते हे ही लक्षात येऊ शकेल.

तसेच गूळापासून होणारी स्पर्धा ही भारतातील साखर कारखान्यांची समस्या का बनते हेही लक्षात येऊ शकेल. कारखान्याच्या संदर्भात ही परिस्थिती सुधारण्याचा प्रयत्न होणे आवश्यक आहे. बिगर सभासदांना कारखान्याचे सभासद करून घेणे व उत्पादक सभासदांबाबत असलेल्या नियमांचे काटेकोर पालन केल्याने कारखान्याला जास्त प्रमाणात ऊस मिळू शकेल.

कारखान्याच्या आठ गळित हंगामापैकी केवळ दोनच हंगामात गाळपशक्तीचा पूर्णपणे वापर झालेला आहे. उपलब्ध उत्पादन क्षमतेचा पूर्णपणे वापर न झाल्यास त्याचा परिणाम उत्पादन खर्च वाढण्यात होऊ शकतो हे लक्षात घेतल्यास कारखान्याच्या एकंदर प्रगतीतील मर्यादा स्पष्ट होतील.

तशीच परिस्थिती कारखान्याच्या हंगाम दिवसांबाबत आहे. कोणत्याही साखर कारखान्याचा हंगाम कमी दिवसांचा असेल तर मोठया प्रमाणावर गुंतविलेले भांडवल ब-याच काळासाठी नुसते पडून रहाते. परंतु उत्पादन बंद असले तरी आस्थापना खर्च करावाच लागतो. हंगाम दिवस हे प्रामुख्याने ऊसाच्या उत्पादनाशी निगडित असल्याचे आढळून येते. १९८१-८२ व १९८२-८३ या वर्षांमध्ये कारखान्याच्या आठ गळित हंगामात ऊसाचे उत्पादन जास्त असल्याचे आढळते साहजिकच या दोन गळित हंगामासाठी कारखान्याचे हंगाम दिवसही जास्त आहेत.

दौलत शेतकरी सहकारी साखर कारखान्यांने साखरेच्या उत्पादनात वाढ केलेली असली तरी हंगाम दिवस गाळप शक्तीचा वापर व ऊसाचा नियमित पुरवठा याबाबत कारखान्याची परिस्थिती फारशी समाधानकारक नाही.

<u>कारखान्याची वाढीव गाळपक्षमता</u> :

कारखान्याच्या कामकाजाच्या संदर्भातच वाढीव गाळप क्षमतेचा विचार करावा लागेल. कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील ऊस लवकर गाळून व्हावा यासाठी १९८३-८४ मध्ये कारखान्याची गाळप क्षमता प्रति दिवशी १२५० मे.टन वरून,

२,००० मे. टन करण्याचे ठरविण्यात आले.[४] परंतु ही गाळप क्षमता वाढवत असताना वाढीव गाळप क्षमतेसाठी आवश्यक असणारा ऊस नियमितपणे उपलब्ध होईल का याचाही विचार करण्याची गरज होती. या वाढीव गाळप क्षमतेमुळे १५० दिवस हंगाम चालू ठेवायचा असला तरीही कारखान्याला ३,००,००० मे.टन ऊसाची गरज आहे. कारखान्याच्या कार्यक्षेत्रात कालव्याच्या पाण्याच्या सोयी नसणे, ऊसाचे उत्पादन नैसर्गिक परिस्थितीवर अवलंबून असणे व कारखान्याच्या आठही गळित हंगामात ऊसाच्या उत्पादनात झालेले तीव्र चढउतार लक्षात घेतल्यास कारखान्याची ऊसाची गरज सातत्याने भागणे अवघड वाटते. तसे झाल्यास वाढीव गाळप क्षमतेसाठी केलेली ४ कोटी रुपयांची गुंतवणूक जास्त काळासाठी वापराशिवाय राहील.

तसेच ऊसाच्या पुरवठ्याच्या अभावी हंगाम दिवस कमी झाल्यास त्याचा परिणाम रोजगार निर्मितीवर होईल. कारखान्याच्या गाळप शक्तीतील वाढ व त्यामुळे उत्पादन खर्चात होणारे बदल यांचा तसेच गाळप शक्ती व कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादन यांचा योग्य समन्वय घातल्यासच कोणताही साखर कारखाना जास्त चांगले कार्य करू शकेल. वाढीव गाळप क्षमतेला परवानगी देत असताना शासनाने या घटकांचा जास्त काळजीपूर्वक विचार करावा अशी अपेक्षा करणे अयोग्य होणार नाही.

या वाढीव गाळप शक्तीसाठी हवा असणारा पैसा कारखान्यांने पूर्णपणे स्व-भांडवलातून उभारलेला आहे. मात्र ही भांडवल उभारणी करत असताना उत्पादक सभासदांची संख्या न वाढविता भागांच्या किंमती वाढवल्या आहेत. त्यानुसार -

वाढीव गाळप क्षमतेसाठी अधिकृत भाग भांडवल

अ) १०,००० भाग प्रत्येकी रु. २,००० किंमतीचे उत्पादक सभासदांसाठी.

----------

४. दौलत शेतकरी सहकारी साखर कारखाना, वार्षिक अहवाल, १९८४-८५.

ब) १०,००० भाग प्रत्येकी रु. २,००० किंमतीचे महाराष्ट्र सरकारसाठी

क) ५०० भाग २,००० किंमतीचे सहकारी संस्थांना देण्यासाठी.

एकंदरीने दौलत शेतकरी सहकारी साखर कारखान्याची सभासदत्व व साखरेचे उत्पादन याबाबतची प्रगती समाधानकारक आहे. परंतु कारखान्याचे कामकाज आणखीन सुरळितपणे चालण्यासाठी ऊसाच्या पुरेशा व नियमित पुरवठ्यांकडे लक्ष देणे जरुरीचे आहे.